दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २८४ । बुधवार १२ ऑगस्ट २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# जातीय तणावाच्या वातावरणात पोलीस अधीक्षकांचा लागणार कस

## सलोखा वाढविण्यासाठी करावे लागणार विशेष प्रयत्न

**अहिल्यानगर– शहरासह जिल्ह्यात गेल्या काही महिन्यांपासून जातीय तणावाच्या घटना घडून संघर्षाचे वातावरण निर्माण झाल्याने पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्यासमोर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये तसेच सलोख्याचे वातावरण कसे वाढेल या दृष्टीने काम करताना चांगलाच कस लागणार आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनीही नुकतेच अहिल्यानगर शहर दहशतमुक्त करण्याचे आदेश पोलिसांना दिले आहेत. त्यामुळे आगामी काळातील पोलिस दलाची भूमिका अत्यंत महत्वाची ठरणार आहे.**



जिल्हा पोलिस अधीक्षक म्हणून मुम्मका सुदर्शन यांनी अहिल्यानगर जिल्ह्याचा पदभार घेऊन तीन महिन्यापेक्षा अधिक कालावधी झाला आहे. चंद्रपूरसारख्या छोट्याशा जिल्ह्यातून थेट अहिल्यानगर जिल्ह्यासारख्या विस्ताराने मोठ्या असलेल्या जिल्ह्याचा पदभार घेतल्यापासून मुम्मका सुदर्शन यांना सातत्याने नवनवीन आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे. श्रीरामपूर पाठोपाठ अतिसंवेदनशील असलेल्या नगर शहरात धीरज परदेशी या तरुणांची मुकुंदनगर येथे झालेली



**विजय सांगळे**
**संपादक, दै.आकर्षण**
**७७७६८१२८११**

हत्या ही पोलिसांसाठी कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टीने मोठी सत्वपरीक्षाच ठरणार आहे.

अहिल्यानगर शहरात सन २००२ व २००३ या वर्षात जातीय संघर्ष वाढत जाऊन तत्कालीन पोलिस अधीक्षक मुधकर गावीत यांच्या कार्यकाळात २००४ मध्ये जातीय दंगल घडली होती. तशीच परिस्थिती सध्या नगर शहरात धुमसत आहे. याची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांना मोठे परिश्रम घ्यावे लागणार आहेत. दरम्यान, तत्कालीन पोलिस अधीक्षक विश्वास नांगरे यांनी जिल्ह्याचा पदभार घेतल्यावर गुन्हेगारांना सुतासारखे सरळ केले होते. त्यामुळे नगर जिल्ह्यात दंगलीची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून मुम्मका सुदर्शन यांनाही तसेच ठाम भूमिका घ्यावी लागणार आहे.

### टू प्लसची यादी जाहीर केल्यास गुन्हेगारांवर राहणार वचक

शहरातील जातीय तणावात गुन्हेगारही आपले डोके वर काढून वातावरण दूषित करण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून येत आहे. मुकुंदनगरमधील घटना नेमकी कोणत्या कारणातून घडली हे पोलिसांकडून अद्याप अधिकृत पुढे आलेले नाही. काही गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांनी शहरातील जातीय तणाव वाढावा या हेतूने तर असे कृत्य केले नसेल ना, अशीही शंका उपस्थित होत आहे. त्यामुळे पोलीस अधीक्षकांनी शहरातील विविध पोलीस ठाण्यांतर्गत असलेल्या गुन्हेगारांची यादी दर महिन्याला अथवा तीन महिन्यांनी प्रसिद्ध केल्यास गुन्हेगारांवर वचक ठेवण्यास पोलिसांना मोठी मदत होऊ शकते. टू प्लस यादीत भले गुन्हेगार कुठल्याही क्षेत्रातील असला तरी पोलीस अधीक्षकांचा हा संदेश गुन्हेगारांपर्यंत गेल्याने त्यांच्यावर पोलिसांचा वचक कायम राहील.

### पालकमंत्री विखे यांचा पोलिसांना फ्री हॅण्ड

अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेमुळे नागरिकांच्या भावनांचा उद्रेक होतो, असे विधान करून पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी पोलिसांना गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्याचे संकेत दिले आहेत. तसेच अहिल्यानगर शहर हे दहशतमुक्त करण्याची घोषणा विखे यांनी शहरातील एका कार्यक्रमात नुकतीच केली. त्यामुळे पोलिसांची जबाबदारी अधिक वाढली आहे. जातीय तणावातून घडणाऱ्या घटना या कायदा सुव्यवस्थेला बाधा निर्माण करत आहेत. कोम्बिंग ऑपरेशन आणि अवैध शस्त्रसाठ्यांवर छापे टाकून कारवाई करण्याचे आदेश ना. विखे यांनी पोलिसांना दिले आहेत. त्यामुळे आगामी काळात पोलिसांना खमकी भूमिका घेवून गुन्हेगारांच्या मुसक्या आवळाव्या लागणार आहेत.



### संग्रामभैय्यांच्या नेतृत्वाखाली नगर शहरातील हिंदू एकवटला



आमदार संग्राम जगताप यांनी प्रखर हिंदूत्ववादी भूमिका घेतल्याने शहरातील हिंदूंना खंबीर आश्रयदाता मिळाला असल्याची भावना आहे. दिवंगत आमदार अनिलभैय्या राठोड यांच्यानंतर संग्रामभैय्या नगर शहरातील हिंदूंचे बलस्थान ठरले आहेत. नुकत्याच झालेल्या धीरज परदेशी हत्या प्रकरणानंतर एकवटलेल्या हिंदू समाजाने ही बाब अधोरेखित झाली आहे.

### मुकुंदनगरला अंत्यसंस्कार झाले नाहीत,आता तेराव्यानंतर रॅली निघणार का?

धीरज परदेशी यांच्या शोकसभेत विविध वकत्यांनी भूमिका स्पष्ट करताना जातीयवादातून झालेल्या हल्ल्याचा निषेध केला. धीरजवर हत्या झाली त्या ठिकाणी मुकुंदनगरमध्ये अंत्यसंस्कार करण्याची भूमिका सुरुवातीला घेण्यात आली होती. पण मुख्यमंत्र्यांनी स्वतः शब्द दिल्याने जमावाने संयम पाळला. परंतु यावेळी वक्त्यांनी केलेली भाषणे हा कळीचा मुद्दा ठरला आहे. मुकुंदनगरमध्ये अंत्यसंस्कार झाले नसले तरी धीरजच्या तेराव्यानंतर थेट भगवे झेंडे आणि कपाळाला टिळा लावून मुकुंदनगर येथून भव्य रॅली काढण्याची घोषणा प्रबोधनकार संग्रामबापू भंडारे यांनी केली आहे. त्याला उपस्थितांनीही भरभरून प्रतिसाद दिला आहे, त्या अनुषंगाने हिंदुत्ववादी कार्यकर्ते कामालाही लागले आहेत. अर्थात ही हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी शक्ती प्रदर्शनासाठी आखलेली व्यूहरचना असली तरी पोलिसांसाठी ही बाब आव्हानात्मक ठरणार आहे.

# तिसगावमध्ये बेकायदेशीर मावा जप्त



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखेने पाथर्डी तालुक्यातील तिसगाव येथे बेकायदेशीर सुगंधी तंबाखू व सुपारीचे मिश्रण करून मावा तयार करणाऱ्या आरोपीला ताब्यात घेतले असून १ लाख १४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सोहेल समीर पठाण (वय २९, रा. माणिकदौंडी, हल्ली रा. रविवार पेठ, तिसगाव, ता. पाथर्डी) असे ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली अतुल लोटके, निळकंठ कारखेले, रणजीत जाधव, दिपक जाधव आणि योगेश कर्डीले यांचे पथक पाथर्डी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत होते. यावेळी सोहेब पठाण हा तिसगाव येथील राहत्या घरी सुगंधी तंबाखू व सुपारीचे मिश्रण करून मावा तयार करत असल्याची गोपनीय माहिती मिळाली.

पथकाने छापा टाकला असता आरोपी सोहेल पठाण हा मावा तयार करताना रंगेहाथ पकडला गेला. पोलिसांना त्याच्याकडून मावा तयार करण्याचे मशीन व साहित्य असा एकूण एक लाख १४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १२३, २२३, २७४ व २७५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# राहात्यात एलसीबीची वाळू तस्करांवर कारवाई

## ३० लाख ४० हजारांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने राहाता पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई केली असून, या कारवाईत दोन डंपर आणि वाळू असा एकूण ३० लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुणतांबा ते शिर्डी रस्त्यावरील नपावाडी शिवारातून अवैध वाळू वाहतूक सुरू



असल्याची गुप्त बातमी पथकाला मिळाली होती. या आधारे नपावाडी चौफुला येथे पान ४ वर

# चार पुलांसाठी १२ कोटी ३४ लाखांचा निधी मंजूर

## खासदार नीलेश लंके यांच्या पाठपुराव्याला यश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील चार महत्त्वपूर्ण पुलांच्या बांधकामांसाठी एकूण १२ कोटी ३४ लाख ८६ हजार रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. खासदार नीलेश लंके यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही कामे मंजूर झाली असून, नगर व पारनेर तालुक्यातील नागरिकांच्या दळणवळणाचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार आहे.

नगर तालुक्यातील मठ पिंपरी ते डोबळेवस्ती मार्गावरील ९० मीटर लांबीच्या पुलासाठी ४ कोटी ६६ लाख ५३ हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत. हा पूल पूर्ण झाल्यानंतर परिसरातील नागरिकांना वर्षभर सुरक्षित व सुरळीत वाहतूक सुविधा उपलब्ध होणार आहे.

पारनेर तालुक्यातील डिकसळ ते जामगाव मार्गावरील पुलाच्या बांधकामासाठी २ कोटी ६६ लाख ४२ हजार रुपये मंजूर झाले आहेत. तसेच गरखिंडी ते आळकुटी मार्गावरील दोन पुलांच्या कामांसाठी अनुक्रमे २ कोटी ८४ लाख ७५ हजार



आणि २ कोटी १७ लाख १६ हजार रुपये निधी मंजूर झाला आहे. ग्रामीण भागातील ओढे, नाले व पाण्याच्या प्रवाहामुळे विशेषतः पावसाळ्यात वाहतुकीला अडथळे निर्माण होतात. अनेकदा नागरिकांना पर्यायी मार्गांचा वापर करावा लागतो. पुलांची कामे पूर्ण झाल्यानंतर ही समस्या मोठ्या प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा आहे.

या पुलांचा सर्वाधिक फायदा शेतकरी, विद्यार्थी, महिला, रुग्ण तसेच दैनंदिन कामासाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांना होणार आहे. शेतमालाची

### मंजूर कामे व निधी

मठ पिंपरी–डोबळेवस्ती, ता. नगर : ९० मीटर पूल : ४ कोटी ६६ लाख ५३ हजार,
डिकसळ–जामगाव, ता. पारनेर : पूल : २ कोटी ६६ लाख ४२ हजार,
गरखिंडी–अळकुटी, ता. पारनेर : पूल : २ कोटी ८४ लाख ७५ हजार,
गरखिंडी–आळकुटी, ता. पारनेर : आणखी एक पूल : २ कोटी १७ लाख १६ हजार
एकूण मंजूर निधी : १२ कोटी ३४ लाख ८६ हजार

वाहतूक अधिक सुलभ होऊन बाजारपेठेशी संपर्क वाढणार आहे. शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या सुविधांपर्यंत पोहोचणेही सोपे होणार आहे.

ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा मजबूत करण्याच्या दृष्टीने ही कामे महत्त्वाची मानली जात आहेत. पुलांमुळे गावागावांतील संपर्क वाढण्याबरोबरच स्थानिक आर्थिक व्यवहारांनाही चालना मिळणार आहे.

निधी मंजूर झाल्यानंतर संबंधित विभागाने प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून पान ४ वर

# मनपा कर्मचारी धीरज परदेशी खून प्रकरणाचा तपास तातडीने मार्गी लावून गुन्हेगारांना कडक शासन करा

## राष्ट्रवादी महिला काँग्रेस पक्षाच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांना निवेदन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरातील महानगरपालिका कंत्राटी कर्मचारी स्वर्गीय धीरज परदेशी यांच्यावर काही गुंडांकडून प्राणघातक हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या धीरज परदेशी यांचा उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला. या प्रकरणाचा तपास तातडीने पूर्ण करून हल्लेखोर व संबंधित गुन्हेगारांवर कडक कायदेशीर कारवाई करावी, जेणेकरून अशा गुन्हेगारी प्रवृत्तींवर कायद्याचा धाक निर्माण होईल आणि भविष्यात अशा घटना घडणार नाहीत, अशी मागणी राष्ट्रवादी महिला काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आली.

याबाबत राष्ट्रवादी महिला काँग्रेस पक्षाच्या जिल्हाध्यक्ष रेश्माताई आठरे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुमका यांना निवेदन देण्यात आले. आमदार संग्राम भैय्या जगताप यांच्या मार्गदर्शन व नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले.



स्वर्गीय धीरज परदेशी हे महानगरपालिकेच्या माध्यमातून नागरिकांना नागरी सुविधा देण्याचे कर्तव्य बजावत होते. कामावर असताना त्यांच्यावर प्राणघातक हल्ला होणे आणि त्यामध्ये त्यांचा मृत्यू होणे ही अत्यंत गंभीर व दुर्दैवी घटना आहे. या घटनेमुळे मनपा कर्मचारी वर्गामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, शहरातील नागरिकांमध्येही चिंतेचे वातावरण आहे.

स्वर्गीय धीरज परदेशी यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह त्यांच्या उत्पन्नावर अवलंबून होता. त्यांच्या अचानक झालेल्या मृत्यूमुळे कुटुंबाचा आधारच हरपला असून, त्यांच्या कुटुंबीयांवर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. त्यामुळे या प्रकरणाचा तपास कोणत्याही प्रकारचा विलंब न करता तातडीने पूर्ण करावा, सर्व आरोपींचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोरात कठोर कायदेशीर कारवाई करावी आणि स्वर्गीय धीरज परदेशी यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

शहरामध्ये कायदा व सुव्यवस्था पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### अहिल्यानगर ते शिर्डी पायी पालखी सोहळा १३ ऑगस्टपासून

अहिल्यानगर - श्रावणमासनिमित्त श्री साईदास परिवार ट्रस्टच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही अहिल्यानगर ते श्री क्षेत्र शिर्डी पायी पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाचा हा पालखी सोहळा गुरुवार दि. १३ ऑगस्ट ते रविवार दि. १६ ऑगस्ट २०२६ या कालावधीत होणार असून, सोहळ्याचे हे २३ वे वर्ष आहे. पालखी गुरुवार दि. १३ ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजता शमी गणपती मंदिर, दिल्लीगेट येथून शिर्डीकडे प्रस्थान करणार आहे. या पालखी सोहळ्यात अंदाजे ५०० ते ५५० साईभक्त पायी शिर्डीला जाणार आहेत.पालखी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी सभासद फी ५०० रुपये असून, नाव नोंदणीसाठी दोन पासपोर्ट फोटो आवश्यक आहेत. चार दिवसांच्या या सोहळ्यासाठी ट्रस्टला सहकार्याची आवश्यकता असून, साईभक्तांनी यथाशक्ती अन्नधान्य किंवा आर्थिक स्वरूपात मदत करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. मदत करू इच्छिणाऱ्यांनी ट्रस्टच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. पायी साईभक्तांसाठी पाच लाखांचा विमा; १० ऑगस्टपूर्वी नोंदणी आवश्यक श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांच्याकडून यावर्षीपासून पायी येणाऱ्या साईभक्तांसाठी चार दिवसांचा पाच लाख रुपयांचा विमा देण्यात येणार आहे. या विम्याचा लाभ घेण्यासाठी १० ऑगस्टच्या आत नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी दोन फोटो, आधार कार्ड आणि मोबाईल क्रमांक संस्थानकडे पाठविणे आवश्यक असल्याचे ट्रस्टने कळविले आहे. पालखी सोहळ्यात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या भक्तांनी नाव नोंदणी करून मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पालखी सोहळ्याच्या नोंदणीसाठी व इतर माहितीसाठी श्री साईदास परिवार ट्रस्टचे कार्यालय, पवन नागरी पतसंस्था, कॅनरा बँकेसमोर, सर्जेपुरा, अहिल्यानगर येथे संपर्क साधता येईल.

### निमगाव वाघात शिक्षक दिनी रंगणार ग्रामीण मराठी साहित्य संमेलन

अहिल्यानगर - स्व.पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने निमगाव वाघा (ता. नगर) येथे शिक्षक दिनानिमित्त राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे आठवे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन असून, यामध्ये राज्यभरातील ज्येष्ठ साहित्यिक व कवी सहभागी होणार असल्याची माहिती संमेलनाचे संयोजक पै. नाना डोंगरे यांनी दिली.५ सप्टेंबरला होणाऱ्या साहित्य संमेलनानिमित्त गावातून ग्रंथ दिंडी काढली जाणार आहे. या दिंडीत साहित्यिक व कवी सहभागी होणार आहेत. यानंतर परिवार मंगल कार्यालयात मान्यवरांच्या हस्ते संमेलनाचे औपचारिक उद्घाटन होणार आहे. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत यांचे परिसंवाद आणि व्याख्याने आयोजन करण्यात आले आहे.

## शाळेचा माजी विद्यार्थीच ठरला विद्यार्थिनींसाठी 'पॅडमॅन'

**कृष्णप्रित वेलफेअर फाऊंडेशनकडून शालेय विद्यार्थिनींसाठी सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीनची भेट | डिस्पोजल व सॅनिटरी पॅडचे मोफत वितरण**



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कर्जुने खारे (ता. नगर) येथील देवराम गंगाराम शेळके पाटील माध्यमिक विद्यालय कृष्णप्रित वेलफेअर फाऊंडेशन, कृष्णाली फाऊंडेशन आणि होगानस इंडिया प्रा. लि. यांच्या सीएसआर सहकार्याने स्वास्थ्य सखी महिला स्वच्छता जनजागृती व आरोग्य कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात सुमारे १५० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

कृष्णप्रित वेलफेअर फाऊंडेशनचे संचालक प्रशांत पाटील शेळके हे याच शाळेचे माजी विद्यार्थी असून त्यांनी आपल्या शाळेतील विद्यार्थिनींच्या आरोग्याची गरज ओळखून सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन, वापरलेल्या पॅडची सुरक्षित विल्हेवाट लावण्यासाठी सॅनिटरी पॅड डिस्पोजल मशीन तसेच सॅनिटरी पॅडचे मोफत वाटप केले. या उपक्रमासाठी माजी विद्यार्थ्याने दाखवलेली सामाजिक बांधिलकीतून तो ''विद्यार्थिनींसाठी पॅडमॅन'' ठरला. या सुविधेमुळे विद्यार्थिनींना शाळेतच आवश्यकतेनुसार सॅनिटरी पॅड सहज उपलब्ध होणार असून वापरलेल्या पॅडची स्वच्छ व वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावणे शक्य होणार आहे.

कार्यक्रमात सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी छायाताई निमसे आणि डॉ. पल्लवी जाधव यांनी किशोरवयीन मुलींना मासिक पाळीबाबत माहिती दिली. मासिक पाळी ही स्त्रीच्या शरीरातील नैसर्गिक जैविक प्रक्रिया असून त्याबाबत असलेले अंधश्रध्दा, गैरसमज आणि लाज–भीती दूर करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. योग्य स्वच्छता, संतुलित आहार, नियमित सॅनिटरी पॅडचा वापर आणि आरोग्याची काळजी याबाबत त्यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

मुख्याध्यापक गोडे सर यांनी सांगितले की, '' आमच्या शाळेचे माजी विद्यार्थी प्रशांत पाटील शेळके यांनी आपल्या शाळेतील मुलींसाठी इतका महत्त्वाचा आणि उपयुक्त उपक्रम राबवून सामाजिक जबाबदारीचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले आहे. मुलींच्या आरोग्यासाठी हा उपक्रम दिशादर्शक असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाला उद्योजक संजय शिंदे, अकोलकर सर, कृष्णाली फाऊंडेशनचे खजिनदार अमर बोबडे, सदस्य सुनिल शेळके, प्रियांका गायकवाड, आशा शेळके, आशासेविका निमसे, फलके, शेळके यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक गोडे सर, कोरडे मॅडम, बांदल मॅडम, सोनटक्के मॅडम, ढवळे मॅडम, चव्हाण मॅडम, कर्डिले सर, धेंडे सर, मिसाळ सर, राहुल गायकवाड आणि प्रशांत लांडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजन कृष्णप्रित वेलफेअर फाऊंडेशनचे संचालक प्रशांत पाटील शेळके आणि संचालिका प्रियांका पाटील शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

## विद्यार्थ्यांचा अभियंता घडविण्याचा प्रवास सुरू – राजेंद्र कटारिया

**डॉ.पाऊलबुधे तंत्रनिकेतनच्या प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचे स्वागत**





**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आजचे युग हे विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे युग आहे या योगाचे नेतृत्व करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये कशी निर्माण करता येईल हे करण्याचे काम महाविद्यालय करीत आहे. पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रात्यक्षिक ज्ञान कौशल्य विकास व्यक्तिगत विकास या महाविद्यालयात होतो. तुमच्यातील अभियंता घडविण्याचा प्रवास आज पासून सुरू झाला आहे.असे प्रतिपादन एमआयडीसी येथील आमिचे चे अध्यक्ष राजेंद्र कटारिया यांनी केले.

नारायण डोह येथील डॉ.पाऊलबुधे तंत्रनिकेतन महाविद्यालयातील प्रथम वर्षातील नवीन प्रवेश घेण्यात आलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.यावेळी प्रमुख पाहुणे राजेंद्र कटारिया, संस्थेचे उपाध्यक्ष रामभाऊ बुचकूल सचिव रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे, आयुर्वेद कॉलेजचे प्राचार्य बाळासाहेब पागिरे तंत्रनिकेतनचे प्राचार्य बाळासाहेब बोर्डे आदि उपस्थित होते.

श्री.कटारिया पुढे म्हणाले हे महाविद्यालय म्हणजे आकाश आहे ते तुमच्या स्वप्नांना पंख देतील, तुम्ही आकाशात उंच भरारी घेण्यासाठी सज्ज व्हा, येथे उज्वल भविष्य तुमचे घडणार आहे. चांगला अभ्यास करा, त्याबरोबरच विविध स्पर्धा कार्यक्रमांमधून तुमची कला, कौशल्य, गुण दाखवा. असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. यावेळी नवीन प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना नोटबुक, पेन, पेन्सिल व इतर शालेय साहित्य वस्तूंचे वितरण भेट म्हणून करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात रामभाऊ बुचकुल म्हणाले संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या सोयी सुविधा पूर्णपणे उपलब्ध असल्याने त्याचा फायदा विद्यार्थ्यांना होतो. तरुण अभियंत्यांनी समृद्ध भारत घडवण्यासाठी चांगली तयारी करावी.असे आवाहन त्यांनी केले.

अॅकॅडमी प्रमुख जयश्री होले यांनी प्रास्ताविकात सेवा शिक्षण प्रसारक मंडळाच्या कार्याची माहिती देत तंत्रनिकेतन मधील सर्व विभाग प्रमुख कशा पद्धतीने काम करतात याची सविस्तर माहिती दिली. सूत्रसंचालन मिनू चूग यांनी केले तर आभार प्राचार्य बाळासाहेब बोर्डे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीते करिता प्रथम वर्ष प्रमुख स्वाती गुंदेचा, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक आदींनी परिश्रम घेतले.

## ओशो मान्सून फेस्टिव्हलमध्ये रंगणार 'सुफी दरबार'; आंतरराष्ट्रीय गायक पवन श्रीकांत नाईक यांची सुरेल मैफिल

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पुण्यातील सुप्रसिद्ध ओशो इंटरनॅशनल मेडिटेशन रिसॉर्ट येथे ११ ते १५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या 'ओशो मेडिटेशन अँड म्युझिक मान्सून फेस्टिव्हल'मध्ये संगीतप्रेमींसाठी एक विशेष पर्वणी ठरणारा 'सुफी दरबार' हा कार्यक्रम रंगणार आहे. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शास्त्रीय आणि सुफी गायक पवन श्रीकांत नाईक यांच्या सादरीकरणामुळे या महोत्सवाला विशेष आकर्षण प्राप्त झाले आहे.




मंगळवार, ११ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री ९.३० ते ११.३० या वेळेत होणाऱ्या या विशेष मैफिलीत सुफी, भक्ती, शास्त्रीय आणि आध्यात्मिक संगीताचा अनोखा संगम अनुभवता येणार आहे. ध्यान, शांतता आणि संगीत यांचा मिलाफ घडवून आणणाऱ्या या कार्यक्रमाची संगीतप्रेमींमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.


पवन श्रीकांत नाईक हे भारतीय शास्त्रीय संगीतासह सुफी गायनाच्या क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय स्तरावर परिचित नाव असून, त्यांनी भारतासह विविध देशांमध्ये आपल्या सुरांची मोहिनी घातली आहे. त्यांच्या सादरीकरणामध्ये अध्यात्म, प्रेम, मानवी मूल्ये आणि सूफी संतांचा संदेश प्रभावीपणे व्यक्त होत असतो.

या मैफिलीत पवन श्रीकांत नाईक यांच्यासमवेत अनेक नामवंत सहकलाकार सहभागी होणार आहेत. कुलदीप चव्हाण, सुरज शिंदे, श्रेयस शित्रे, पवन तळेकर, नवरत्न वर्मा, निनाद पारखी, जयंत पाठक, पंकज शर्मा, सरोज पलाडिया, कल्याण मुरकुटे, पंकज नाईक, अथर्व कोरडे, मुलांशु परदेशी आणि संकेत गांधी हे कलाकार विविध वाद्यसंगती आणि स्वरांच्या माध्यमातून कार्यक्रमाला बहार आणतील.

तबला, हार्मोनियम, काहोन, बेंजो आणि इतर वाद्यांच्या सुरेल साथीत सादर होणारा 'सुफी दरबार' हा कार्यक्रम केवळ संगीत मैफल न राहता एक आध्यात्मिक अनुभव ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे. सुफी संगीताच्या माधुर्यातून ध्यान आणि अंतर्मुखतेचा अनुभव देण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून केला जाणार आहे.

## मानवता हाच एक धर्म सामाजिक संस्था व नेक्स्ट लेव्हल फिटनेसच्या वतीने युवक-युवतींना नशा मुक्तीचा संदेश

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** मानवता हाच एक धर्म सामाजिक संस्था व नेक्स्ट लेव्हल फिटनेसच्या माध्यमातून युवक–युवतींना सकारात्मक दिशा देत नशेपासून दूर राहण्याचा आणि आरोग्य–क्रीडा क्षेत्रात आपले करिअर घडविण्याचा संदेश देण्यात आला. तर राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन उत्कृष्ट यश संपादन केलेल्या खेळाडूंचा सन्मान मानवता हाच एक धर्म संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अल्ताफ सय्यद यांच्या हस्ते करण्यात आला.

अल्ताफ सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली युवकांमध्ये आरोग्य, क्रीडा आणि सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. याच सकारात्मक विचारांना बळ देणाऱ्या नेक्स्ट लेव्हल फिटनेस जिममध्ये युवक–युवतींना केवळ व्यायामाची सुविधा नाही, तर क्रीडा क्षेत्रात करिअर घडविण्यासाठी मोठे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. या जिममध्ये प्रशिक्षण घेतलेल्या अनेक युवकांनी नेक्स्ट लेव्हल फिटनेसचे संस्थापक डेव्हिड मकासारे यांनी युवक–युवतींना प्रेरणादायी संदेश देताना सांगितले की, तरुणाईमध्ये प्रचंड ऊर्जा आणि क्षमता आहे. या ऊर्जेला योग्य दिशा दिली, तर प्रत्येक युवक आपल्या आयुष्यात मोठे यश मिळवू शकतो. मेहनत, शिस्त आणि सातत्याच्या जोरावर राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर आपली ओळख निर्माण करण्याचे त्यांनी आवाहन केले.

## आदिवासी संस्कृती, ज्ञानपरंपरा आणि निसर्गसंवर्धनाची परंपरा जपली पाहिजे–प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित




**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आदिवासी समाज निसर्गाला ओरबाडत नाही, तर निसर्गाशी सहजीवन साधत त्याचे संवर्धन करतो. जल, जंगल, जमीन, नद्या आणि डोंगर यांच्याशी आदिवासी समाजाची अतूट नाळ जोडलेली आहे.धरतीमाते बद्दल कृतज्ञता बाळगणारी आदिवासी संस्कृती ही समृद्ध ज्ञानपरंपरा,जीवनमूल्ये आणि निसर्गसंवर्धनाची शिकवण देणारी परंपरा आहे. ही संस्कृती, ज्ञानपरंपरा आणि निसर्गाशी असलेले नाते नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी सर्वांची आहे,असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांनी केले.

९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिनानिमित्त आदिवासी सामाजिक बहुउद्देशीय संस्था, अहिल्यानगर यांच्या वतीने टिळक रोड येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थाना वरून त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षपदाची सूचना संस्थेचे सहसचिव शिवानंद भांगरे यांनी मांडली, तर त्यास अनुमोदन संस्थेचे सचिव कविराज बोटे यांनी दिले.

यावेळी माजी नगरसेविका प्रतिमा भांगरे,कार्यकारी अभियंता किरण देशमुख, सेवानिवृत्त साखर आयुक्त ज्ञानदेव मुकणे,सेवानिवृत्त अधीक्षक रामभाऊ कचरे, सुरेश रामजी देशमुख, संजय गंभीरे,धुळे येथील उपजिल्हाधिकारी गंगाराम तळपाडे, प्रा.भाऊराव नाडेकर,अॅड.लक्ष्मण डामसे, माजी सहसंचालक डॉ. पी. डी.गांडाळ, प्रा.डॉ.नितीन तळपाडे,आदिवासी संस्कृतीचे अभ्यासक संजय साबळे, तसेच संस्थेचे अध्यक्ष जगन्नाथ सावळे आदी मान्यवर उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष जगन्नाथ सावळे यांचे प्रास्ताविक; संस्थेच्या कार्याचा घेतला आढावा

संस्थेचे अध्यक्ष जगन्नाथ सावळे यांनी प्रास्ताविकातून त्यांनी आदिवासी सामाजिक बहुउद्देशीय संस्थेने आजपर्यंत सामाजिक,शैक्षणिक, सांस्कृतिक आणि समाजहिताच्या क्षेत्रात केलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला.विद्यार्थ्यांना प्रोत्साहन, गुणवंतांचा सन्मान,ज्येष्ठांचा गौरव, महिलांचा सन्मान, सामाजिक जनजागृती,आदिवासी संस्कृती व लोकपरंपरांचे संवर्धन तसेच समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्यासाठी संस्था करीत असलेल्या कार्याची माहिती त्यांनी दिली.

संस्थेच्या कार्यात आजवर प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे सहकार्य करणाऱ्या, मार्गदर्शन करणाऱ्या आणि विविध उपक्रमांना पाठबळ देणाऱ्या सर्व मान्यवरांचे त्यांनी विशेष आभार मानले. तसेच जागतिक आदिवासी दिनाच्या कार्यक्रमाला प्रत्यक्ष उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविणाऱ्या सर्व मान्यवरांचे स्वागत व अभिनंदन केले. काही अपरिहार्य कारणांमुळे कार्यक्रमाला उपस्थित राहता न आलेल्या मान्यवरांनी व्यक्त केलेल्या सदिच्छा आणि सहकार्याबद्दलही त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.कोतूळ येथून सोमनाथ लेंभे यांनी आवर्जून उपस्थित राहून कार्यक्रमाला विशेष उपस्थितीची शोभा वाढविली. त्यांच्या या आपुलकीच्या सहभागाबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचे मनः पूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. केवळ सांस्कृतिक कार्यक्रम नव्हे, तर समाजाला प्रेरणा देणारा उपक्रम

आदिवासी सामाजिक बहुउद्देशीय संस्थेने जागतिक आदिवासी दिनाचा कार्यक्रम केवळ नृत्य, गाणे आणि मनोरंजनापुरता मर्यादित न ठेवता समाजातील चांगल्या कार्याला प्रोत्साहन, गुणवंतांना प्रेरणा आणि नव्या पिढीला दिशा देणारा सामाजिक उपक्रम म्हणून त्याचे नियोजन केले. समाजासाठी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना 'आदिवासी समाजभूषण पुरस्कार' देऊन गौरविण्यामागे त्यांच्या कार्याची दखल घेण्याबरोबरच इतर समाजबांधवांनीही त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी अधिक जोमाने काम करावे, हा व्यापक उद्देश होता.

## शब्दकोडे क्रमांक : २७

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | | ■ | ४ | ५ | | ■ | ६ | ७ |
| | ■ | ८ | | ■ | ९ | ■ | | ■ | १० | | |
| ११ | १२ | | ■ | १३ | ■ | १४ | | १५ | ■ | | ■ |
| १६ | | ■ | १७ | | | | ■ | १८ | १९ | ■ | २० |
| ■ | २१ | २२ | | | ■ | २३ | २४ | ■ | २५ | २६ | |
| २७ | ■ | २८ | | ■ | २९ | ■ | ३० | ३१ | ■ | | ■ |
| ३२ | ३३ | | ■ | ३४ | | | ■ | ३५ | | ■ | ३६ |
| ३७ | | ■ | ३८ | ■ | | ■ | ३९ | | ■ | ४० | |
| ■ | ४१ | ४२ | ■ | ४३ | | ४४ | | ■ | ४५ | ■ | |
| ४६ | ■ | ४७ | ४८ | | ■ | | ■ | ४९ | | | ■ |
| ५० | | ■ | | ■ | ५१ | | | ■ | | ■ | ५२ |
| | ■ | ५३ | | | ■ | | ■ | ५४ | | | |

**आडवे शब्द :** १. महाराष्ट्रातील एक जिल्हा ४. वाईट इच्छा ६. दीप ८. नापास विरुद्ध ९. इंग्रजीत तळपायाचची बोटं १०. भात आणि भाजी मिळून तयार होणारे खाद्यपदार्थ ११.एक चवदार मासा १४.चौकात एकत्रित बसून गप्पा मारण्याची जागा १६. तग १७. एक गोड पेय १८.आब,इज्जत २१. हिंदीत द्वेष २३.बशीचा जोडीदार,चहा पिण्याचे पात्र २५.वाद्य वाजवणारा २८. रुची ३०. नशीब इंग्रजीत ३२. कारणीभूत ठरलेला ३४.भारताचे राष्ट्रीय फूल ३५. बंध ३७. नजर ३८. संगीत सप्तकातील अखेरचा स्वर ३९. हाव ४०. खरा - विरुद्ध ४१. विचार ४३. सप्त सुरांची धून ४७. वचन ४९. थोर कृष्ण सखा ५०. पाणी ५१. आळ ५३. मनुष्य ५४. टावरासु- उलट लिहा

**उभे शब्द :** १.नरकाचे अधिपती २. शोध ३. महिना ५. रियाज ६. मनास तात्पुरता मिळालेला आनंद ७. मोकळीक १२. वांती १३. पुन्हा १४.एक काल्पनिक पक्षी १५. इंग्रजीत- खोल १७. हुशार १९. चपाती भाजण्याचे साधन २०. चक्र २२. अंतर २४. क्षण २६. बाद- उलट लिहा २७. बंधनात नसलेला २९. मजदूर ३१. गोंधळ ३३. रोकड ३६. लाकडाची पेटी ३९. हिंदीत - मेण ४२. ग्रामीण बोलीत तेव्हा ४३. नेहमी ४४. गोंगाट ४५. स्त्री कलाकार हिंदी ४६. वाजवी दरातला ४८. संगीतातील एक राग ५२. नफा विरुद्ध

### शब्दकोडे क्रमांक : २६ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शि | व | से | ना | ■ | म | न | मा | नी | ■ | वा | व |
| का | ■ | वा | ■ | सा | ल | स | ■ | ट | र | फ | ल |
| री | घ | ■ | क | ल | म | ■ | का | ■ | सा | ■ | य |
| ■ | र | वा | ळ | ■ | ल | ल | का | र | ■ | ह | ■ |
| खो | टे | ■ | प | ती | ■ | त | ■ | म | द | म | स्त |
| ड | ■ | ना | ■ | न | वा | ■ | ह | मा | ल | ■ | र |
| ■ | बे | का | बू | ■ | त | न | ■ | ण | ■ | मे | ■ |
| चा | ल | ■ | ट | र | ■ | त | म | ■ | क | ह | र |
| ■ | न | ड | ■ | शी | त | ■ | द | वा | ■ | न | व |
| दु | ■ | ग | ट | ■ | र | पे | ट | ■ | छ | त | ■ |
| का | य | र | ■ | पा | ■ | ट | ■ | ग | प्प | ■ | आ |
| न | स | ■ | न | व | री | ■ | घो | ■ | र | मा | ई |

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)


The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

# शिवसेनेचा निष्ठावंत वाघ आणि श्रीगोंद्याचा लोकनेता काळाच्या पडद्याआड

## अहिल्यानगर जिल्ह्याच्या राजकारणातील एका ध्येयनिष्ठ, सेवाभावी पर्वाचा अस्त

**ज्या काळात अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्याच्या शहरी व ग्रामीण भागात शिवसेनेचे नाव घेणे म्हणजे एक राजकीय धाडस मानले जात होते, त्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांवर अढळ श्रद्धा ठेवून भगवा फडकवणारे शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे महाराष्ट्रातील एक ज्येष्ठ नेते व माजी श्रीगोंदा तालुका प्रमुख भाऊसाहेब तथा अनशाबापू हिराजी गोरे काळाच्या पडद्याआड गेले. त्यांच्या निधनाने श्रीगोंदा तालुक्यासह अवघ्या अहिल्यानगर जिल्ह्यातील शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचा एक भक्कम आधारवड कोसळला आहे. भाऊसाहेबांचे नातू व नव्या पिढीतील माध्यम तज्ज्ञ यश सविता बाळासाहेब बोठेपाटील यांनी उलगडवलेला भाऊसाहेबांचा जीवनपट.**

अहिल्यानगर–सोलापूर रस्त्यावरील नगरपासून २६ किलोमीटर अंतरावरील रुईछत्तीशी हे भाऊसाहेब गोरे यांचे मूळ गाव. सुमारे ५५ वर्षांपूर्वी ते नोकरीनिमित्त श्रीगोंद्यात आले आणि तिथल्या मातीशी कायमचे एकरूप झाले. सुरुवातीला विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेत सचिव म्हणून सुरक्षित व सुस्थिर नोकरी करत असताना, त्यांच्या अंतर्मनातील समाजकारणाचा आणि हिंदुत्वाचा अंगार त्यांना स्वस्थ बसू देत नव्हता. वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांनी संसाराची अथवा भविष्याची कोणतीही पर्वा न करता सुरक्षित नोकरीला लाथ मारली आणि शिवसेनेच्या काटेरी व खडतर वाटचालीचा मार्ग निवडला. त्या काळात ग्रामीण भागात शिवसेना स्थापन करणे म्हणजे एक प्रकारचे 'अतिरेकी धाडस' मानले जाई. दळणवळणाची व संपर्काची कोणतीही साधने नसताना, स्वतःच्या संसारावर तुळशीपत्र ठेवून भाऊसाहेबांनी सायकलवर आणि पायी फिरून खेडोपाडी शिवसेनेची पाळेमुळे घट्ट रोवली.



### ३५ वर्षांचा राजकीय चमत्कार : दक्षिण अहिल्यानगरचा 'विजयी बालेकिल्ला'

भाऊसाहेबांच्या ३० ते ३५ वर्षांच्या तालुकाप्रमुख पदाच्या कार्यकाळात श्रीगोंद्यात शिवसेनेने केवळ अस्तित्वच निर्माण केले नाही, तर जिल्ह्याच्या राजकारणाची दिशा ठरवणारे केंद्रस्थान बनवले. त्यांच्या अफाट जनसंपर्क, अचूक राजकीय रणनीती आणि निष्ठावान कार्यकर्त्यांच्या फळीमुळे गेल्या ३५ वर्षांत अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातून विजयी झालेल्या प्रत्येक खासदाराला श्रीगोंदा तालुक्यातून भक्कम व निर्णायक मताधिक्य मिळाले. कोणत्याही मोठ्या संस्थांचे, साखर कारखान्यांचे अथवा सत्तेचे पाठबळ नसताना केवळ भाऊसाहेबांच्या तळागाळातील संघटन कौशल्यावर आणि कार्यकर्त्यांवरील प्रेमाच्या बळावर हा राजकीय इतिहास दीर्घकाळ घडत राहिला.

### पक्षनिष्ठा, त्याग आणि साधेपणाचा दीपस्तंभ विझला !

एक सच्चा शिवसैनिक, हिंदुत्वाचा निष्ठावान पहारेकरी आणि गोरगरीब जनतेचा पाठीराखा असलेला गोरे भाऊसाहेब यांच्या रुपातील मावळा अनंतात विलीन झाला आहे. साधेपणा, निस्वार्थ जनसेवा आणि टोकाची पक्षनिष्ठा यांचा आदर्श घालून देणारे गोरे भाऊसाहेब जरी आज देहाने आपल्यात नसले, तरी त्यांनी श्रीगोंद्याच्या मातीत रोवलेला निष्ठेचा भगवा आणि त्यांचे समाजकार्य पुढील अनेक पिढ्यांसाठी निश्चितच दीपस्तंभ ठरेल. वंदनीय हिंदु हृदयसम्राटांच्या या निष्ठावंत शिलेदाराला, आदरणीय गोरे भाऊसाहेबांना विनम्र व भावपूर्ण आदरांजली..!

### 'ऊस उपाशी; गावाला तृप्ती' जिवंत माणुसकीचा झरा

भाऊसाहेब श्रीगोंदे तालुक्यासह शिवसेनेच्या राज्यभरातील परिवारात 'गोरे भाऊसाहेब' या नावाने परिचित होते. ते केवळ राजकारणी नव्हते, तर जनतेच्या सुख दुःखात धावून जाणारे संवेदनशील समाजसेवक होते. भीषण दुष्काळाच्या काळात श्रीगोंदा शहरात जेव्हा पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण झाले होते, तेव्हाची त्यांची माणुसकी आजही तालुक्याच्या स्मरणात आहे. श्रीगोंदा–आढळगाव रस्त्यावरील आपल्या शेतातील उभा ऊस, भुईमूग व भाजीपाल्याची बागायत पिके जळून जाण्याचा धोका असतानाही त्यांनी स्वतःच्या पिकांचा विचार बाजूला ठेवला. ''माझी पिकं जळाली तरी चालतील, पण जनतेला पिण्याचे पाणी मिळाले पाहिजे; जोपर्यंत माझ्या कूपनलिकेला पाणी आहे, तोपर्यंत ते समाजाच्या मालकीचे राहील,'' हा बाणा दाखवत त्यांनी नगरपालिका व तालुक्यातील गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणा–या टँकरसाठी आपली विंधनविहीर (बोअरवेल) पूर्णपणे मोफत खुली केली होती. स्वतःचे आर्थिक नुकसान सोसून तहानलेल्या जनतेची तहान भागवणारा असा नेता विरळाच!

### संस्थांविना कार्यकर्ते घडवणारा आणि टिकवणारा आधारवड

साखर कारखाने, शिक्षण संस्था आणि प्रचंड साधनसामग्री असलेल्या मातब्बर नेत्यांशी स्पर्धा करताना भाऊसाहेबांकडे केवळ वंदनीय बाळासाहेबांचे विचार, कोणत्याही आमिषाला बळी न पडता प्रामाणिकपणे कार्यरत कार्यकर्त्यांची फळी आणि अथांग जनप्रेम होते. या बळावरच त्यांनी हजारो निष्ठावान कार्यकर्ते घडवले, त्यांना संकटकाळात सांभाळले आणि कायम पाठबळ दिले. काँग्रेस आणि राष्ट्रवादी आघाडीचे वर्चस्व असतानाच्या काळातही त्यांनी प्रतिकुलतेशी दोन हात केले. अनेकदा राजकीय आमिषे आली, दबाव आले; परंतु त्यांनी कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता अखेरपर्यंत ठाकरेंशी असलेली निष्ठा कधीही ढळू दिली नाही. ''श्रीगोंद्यात शिवसेना म्हणजे गोरे भाऊसाहेब आणि गोरे भाऊसाहेब म्हणजे शिवसेना'' हे समीकरण त्यांनी आयुष्यभर जपले. कार्यकर्ते जोपासताना भाऊसाहेबांच्या सहचारिणी कै. लीलावती गोरे यांचे योगदान अतुलनीय होते. त्यांनी कधी पतीकडे हट्ट केला नाही. उलट भाऊसाहेबांकडे येणाऱ्या कार्यकर्त्यांचे चहा–पान, जेवण यासाठीच त्यांनी आपले अख्खे आयुष्य खर्ची केले. राजकीय पक्षासाठी स्वतःचे आजारपण झेलीत व हलाखीच्या आर्थिक परिस्थीतीशी झगडत पतीच्या समाजकारण व राजकारणात अशी अनोखी सेवा करणारी भाऊसाहेबांची धर्मपत्नी त्यांच्या सर्व मावळ्यांसाठी खरीखुरी माऊलीच !

### दुःखाचे डोंगर पचवणारा हिमालयासारखा संयम

जवळपास २५ वर्षांपूर्वी गोरे भाऊसाहेबांची बायपास पुण्यात बायपास शस्त्रक्रिया झाली. तत्कालीन केंद्रीय अवजड उद्योग मंत्री बाळासाहेब विखे पाटील हे केवळ त्यांना भेटण्यासाठी थेट दिल्लीहून पुण्यात आले व त्यांना भेटून परत दिल्लीला लगेच रवाना झाले. शस्त्रक्रियेनंतर भाऊसाहेब हबकून गेले नाहीत. शिस्तबध्द दिनचर्या, नियमित व्यायाम आणि सकारात्मक दृष्टीकोनाच्या जोरावर त्यांनी स्वतःला सक्रिय ठेवले. मधुमेह, रक्तदाब यासह इतर आजारांवरही त्यांनी मात केली. आयुष्याच्या उत्तरार्धात आधी धर्मपत्नीचे आणि नंतर एकुलत्या एक मुलाचे दुःखद निधन झाले. या अकल्पनीय आघातांनी भाऊसाहेबांना आंतरबाह्य हादरवून सोडले. असे असतानाही, डोळ्यांतील अश्रू मनात गिळून त्यांनी समर्थपणे समाजकारण करीत कुटुंबाला खंबीर आधार दिला. सर्व जाती–धर्माच्या लोकांशी त्यांनी जिवाभावाचे नाते जपले. ज्यामुळे ते एका पक्षापुरते मर्यादित न राहता संपूर्ण तालुक्याचे लोकनेते बनले.

### 'मातोश्री'शी थेट स्नेह आणि दिग्गज नेत्यांचा विश्वास

भाऊसाहेबांच्या धडाकेबाज कार्याची ख्याती थेट 'मातोश्री'पर्यंत होती. वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांनी स्वतः भाऊसाहेबांना व त्यांच्या शिलेदारांना अनेकदा मातोश्रीवर पाचारण करून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारली होती. पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनीही त्यांच्या कार्याची नेहमीच मुक्तकंठाने प्रशंसा केली. युवासेना प्रमुख असताना राज ठाकरे यांनीही मेळाव्यानिमित्त श्रीगोंद्याला भेट देऊन भाऊसाहेबांच्या कामाची जाहीरपणे स्तुती करीत तरुणांच्या त्यांच्या विचारांची कास धरण्याचे आवाहन केले होते. याशिवाय भाऊसाहेबांच्या घरी भेट देत त्यांचे मनापासूनचे आदरातिथ्यही स्वीकारले होते. गोपीनाथ मुंडे व अजितदादा पवार या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांशीही भाऊसाहेबांचे संबंध घरोब्याचे होते. श्रीगोंद्याच्या दौऱ्यात हे दोन्हीही नेते भाऊसाहेबांना आवर्जून भेटत. शिवसेनेचे उपनेते व माजी मंत्री कै. अनिल राठोड, ज्येष्ठ नेते भाऊ कोरगावकर, युती सरकारमधील मंत्री शाबीरभाई शेख, गुलाबराव गावंडे, अहिल्यानगर जिल्ह्यातील शिवसेनेचे संस्थापक असलेले नेते श्रीराम येंडे, सुहास वहाडणे, बाबूशेठ टायरवाले, उमेश गिल्डा, अंबादास पंधाडे, गोरक्ष भालसिंग, आनंदराव शेळके, महादेव सातपुते, संजय कोतकर, नंदकुमार ताडे, भाजयुमोचे तत्कालीन नेते घनश्यामअण्णा शेलार यांच्यासह राज्यातील प्रमुख नेत्यांच्या खांद्याला खांदा लावून भाऊसाहेबांनी ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या तत्त्वाचा आयुष्यभर अंगीकार केला.

---

## दै. आकर्षण निवडक

### संत सावता महाराजांनी जनसामान्याना भक्तीचा मार्ग दाखविला - बोराटे

अहिल्यानगर- मानवता, समता, विश्वबंधूता या नितीमूल्यांवर आधारित असलेला हा वारकरी संप्रदाय आज समाजाचा आरसा आहे. कांदा, मुळा भाजी.. अवघी विठाई माझी.. या अभंगाने प्रत्येकच्या मनावर राज्य करणारे संत म्हणजेच सावता माळी होय. जीवनात कर्तव्यकर्मे करीत असतानाच तन-मन-धनाने ईश्वरभक्ती करता येते, हा अधिकार सर्वांना आहे. या विचारातून जनसामान्यांना भक्तीचा मार्ग दाखविला. धार्मिक प्रबोधनाचे व भक्ती प्रसाराचे कार्य त्यांनी निष्ठेने व्रत म्हणून आचरिले. समरसता आणि अलिप्तता यातील विलक्षण समतोल त्यांच्या जीवनचरित्रातून दिसून येतो, असे प्रतिपादन संस्थांचे तथा चेअरमन नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांनी केले. श्री संत सावताश्रम शिक्षण समितीच्यावतीने संत सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त माळीवाडा येथील मंदिरात अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे चेअरमन नगरसेवक बाळासाहेब बोराटे, सचिव प्रा.सुनिल जाधव, प्राथमिक चे मुख्याध्यपक राजकुमार शिंदे ,माध्यमिक चे मुख्याध्यपक राजीव घोलप, कविता शिंदे ,संगीता बडे ,मीना पगारे ,,कुंभारे ,अनिल शिंदे ,रमेश बोरबने आदी उपस्थित होते. याप्रसंगी सुनिल जाधव म्हणाले, प्राचीन काळापासून या महाराष्ट्राच्या भूमीमध्ये अनेक शूर, वीर, संत मंडळी होऊन गेले. अनेक संतांनी वारकरी संप्रदायाला खरी शोभा मिळवून दिली. संत सावता महाराजांनी अध्यात्म आणि भक्ती, आत्मबोध आणि लोकसंग्रह, कर्तव्य आणि सदाचार याची बेमालूम सांगड घातली. धर्माचरणातील अंधःश्रद्धा, कर्मठपणा यास विरोध करुन केवळ ईश्वराचे अंतःकरणपूर्वक चिंतनाने ईश्वर प्रसन्न होतो, असा साधा भक्तीचा मार्ग दाखलविला.

### सतीश मुळे यांचे निधन

अहिल्यानगर - केडगाव देवी अहिल्यानगर येथील



रहिवासी स्व. श्री. सतीश श्रीनिवास मुळे , वय - ७० यांचे अल्पशा आजाराने शनिवार दिनांक ८ ऑगस्ट २०२६ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी ,मुलगा, सून, नात, मुलगी ,जावई असा परिवार आहे. ग. ज. चिदांबर ( पूर्वीचे कन्या विद्या मंदिर) शाळेत ते ३८ वर्ष वरिष्ठ लिपिक पदावर कार्यरत होते. त्यांचा मित्रपरिवार मोठा होता. समाजामध्ये मनमिळाऊ तसेच कायम मदतीला उभे राहणारे व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या जाण्याने कधीही भरून न निघणारी अशी पोकळी निर्माण झाली असून ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

---

## सरकारी शाळांच्या दुरवस्थेविरोधात १५ ऑगस्टपासून जनआंदोलन

### ॲड. सुभाष खडसन यांच्या मागणीची दखल; अभिजीत दिपके यांची घोषणा



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** देशाच्या स्वातंत्र्याला ८० वर्षे पूर्ण होत असतानाही ग्रामीण भागातील सरकारी व जिल्हा परिषद शाळांची दुरवस्था कायम असल्याचा आरोप करत १५ ऑगस्टपासून सरकारी शाळांच्या प्रश्नांवर व्यापक जनआंदोलन छेडण्यात येणार आहे. सीजेपी अर्थात कॉकरोच जनता पार्टीच्या माध्यमातून हे आंदोलन उभारण्यात येणार असल्याची घोषणा अभिजीत दिपके यांनी केली.

ॲड. सुभाष बाबुराव खडसन यांनी ९ ऑगस्ट रोजी अभिजीत दिपके यांची भेट घेऊन देशातील शैक्षणिक क्षेत्राची झालेली दुरवस्था, सरकारी शाळांमधील मूलभूत सुविधांचा अभाव तसेच ग्रामीण व गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या प्रश्नांवर चर्चा केली. या मागणीची दखल घेत दिपके यांनी आंदोलनाची घोषणा केली.

ग्रामीण भागातील अनेक सरकारी शाळांमध्ये आजही विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत आहे. काही ठिकाणी शाळेत जाण्यासाठी विद्यार्थ्यांना मोठी पायपीट करावी लागत असल्याचेही निदर्शनास आणून देण्यात आले.

गावातील शाळांमध्ये प्रामुख्याने शेतकरी, कष्टकरी आणि गरीब कुटुंबातील मुले शिक्षण घेतात. त्यामुळे सरकारी शाळांचा दर्जा उंचावणे, शाळांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे आणि विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे गरजेचे असल्याचे ॲड. खडसन यांनी सांगितले. दरम्यान, युवकांचे विविध प्रश्न आणि मागण्या देखील दीर्घकाळापासून प्रलंबित असून त्यांच्या भवितव्याचा विचार करून त्यांची सोडवणूक करण्याची आवश्यकता आहे, अशी भूमिका बैठकीत मांडण्यात आली. 'सरकारी शाळा वाचवा, ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण द्या' या मागणीसाठी १५ ऑगस्टपासून आंदोलनाची सुरुवात करण्यात येणार असून, या मोहिमेत नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

## सावता महाराजांनी कामामध्ये देव शोधला – आकाश महाराज फुले

### नेप्तीत सावता महाराज पुण्यतिथी निमित्त तीन दिवशीय सप्ताहास प्रारंभ



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील नेप्ती येथे श्री संत शिरोमणी सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त तीन दिवसीय अखंड हरिनाम सप्ताहास मोठ्या भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. श्री संत शिरोमणी सावता महाराज मंदिरात श्री संत सावता महाराज तरुण मंडळ, माळी समाज व नेप्ती ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. ९ ऑगस्ट ते मंगळवार दि. ११ ऑगस्ट २०२६ या कालावधीत या धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती रामदास फुले यांनी दिली आहे.

या सप्ताहाचे उद्घाटन ह.भ.प. शिवचरित्रकार आकाश महाराज फुले यांच्या हस्ते वीणा पूजन करून करण्यात आले. यावेळी माजी उपसरपंच जालिंदर शिंदे, माजी सरपंच अंबादास पुंड, ह.भ.प. शिवचरित्रकार आकाश महाराज फुले, समता परिषदेचे तालुकाध्यक्ष रामदास फुले, शाखा अध्यक्ष शाहूराजे होले, प्राध्यापक एकनाथ होले, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य शिवाजी होळकर, मुख्याध्यापक बाबा भोर, ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ पुंड ,संतोष चौरे, गोरख फुले, प्राध्यापक भाऊसाहेब पुंड ,पांडुरंग फुले, सिताराम बेल्हेकर, राजू फुले ,पाराजी होळकर, रोहन देशपांडे, सिताराम शिंदे, अनिल चहाळ, आण्णा होळकर, अशोक रावळे, तुकाराम होले, सचिन पुंड ,भोला नेमाने, रामातात्या होले , कैलास बेल्हेकर, तुषार भुजबळ , ओंकार भुजबळ, कैलास चौरे, बाबासाहेब चौरे, उत्तम फुले, तेजस नेमाने यांच्यासह ग्रामस्थ व परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संत सावता महाराजांनी केवळ भक्तीचा मार्ग सांगितला नाही, तर कष्ट, प्रामाणिकपणा आणि कर्माला भक्तीची जोड दिली. शेतात कष्ट करत असतानाही त्यांनी पांडुरंगाचे नामस्मरण सोडले नाही. त्यामुळे त्यांच्या जीवनातून 'कर्म हेच पूजन आणि प्रामाणिक कष्ट हीच खरी भक्ती' असा संदेश समाजाला मिळतो. संत सावता महाराजांचे विचार केवळ एका समाजापुरते मर्यादित नसून संपूर्ण मानवजातीला मार्गदर्शन करणारे आहेत. आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनात त्यांच्या विचारांची गरज अधिक आहे. सावता महाराजांनी कामामध्ये देव शोधला असे प्रतिपादन शिवचरित्रकार आकाश महाराज फुले यांनी केले .

सालाबादप्रमाणे याही वर्षी हा धार्मिक सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. सप्ताहामध्ये दररोज हरिपाठ व किर्तनाचे आयोजन करण्यात आले असून, सायंकाळी ५ ते ७ या वेळेत हरिपाठ, तर सायंकाळी ७ ते ९ या वेळेत किर्तन होणार आहे. सप्ताहाच्या पहिल्या दिवशी रविवार दि. ९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ ते ९ या वेळेत अनुष्का दिदी जाधव, ज्ञानाई मुलींची वारकरी शिक्षण संस्था, नेप्ती यांचे किर्तन होणार आहे. सोमवार दि. १० ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ ते ९ या वेळेत ह.भ.प. श्री शंकर महाराज लोखंडे, कोल्हार खुर्द, गणेशवाडी यांचे किर्तन होईल.

---

नमो अरिहंताणम.. नवकार महामंत्र जापने आनंदधाम परिसरात अवतरले नवचैतन्य

## नवकार महामंत्राचा नियमित जाप जीवनासाठी दिशादर्शक - पूज्य प्रविणऋषीजी महाराज

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** आत्मकल्याण, श्रद्धा आणि भक्तीचा संगम असलेल्या अर्हम विज्जा प्रणेता उपाध्याय प्रवर पूज्य श्री प्रविणऋषीजी म.सा. यांच्या सान्निध्यात सुरू असलेल्या समर्पण चातुर्मास २०२६ मध्ये रविवारची सकाळ सर्वार्थाने अद्भुत ठरली. आनंदधाम परिसरात एकाच वेळी ३० हजारांहून अधिक भाविकांनी अतिशय श्रद्धेने जवळपास ५ कोटी नवकार महामंत्र जाप केला. अतिशय तल्लीनतेने व तालासुरात आबालवृद्धांनी या महामंत्राचा जाप करत पंचपरमेष्ठींना अभिवादन केले. आचार्यश्रींच्या पावन भूमीत या कार्यक्रमाने सकारात्मक ऊर्जेची प्रभा अवतरली. देशभरातील हजारो साधकांनी ऑनलाईन पद्धतीने या कार्यक्रमात सहभाग घेतला.

सकाळपासूनच आनंदधाम परिसरात नवचैतन्य निर्माण झाले होते. एका ऐतिहासिक आध्यात्मिक पर्वणीत सहभागी होत असल्याचा आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर झळकत होता. आनंद तीर्थ समवशरण येथे महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषीजी म.सा., पूज्य ज्ञानप्रेमविजयजी म.सा., पूज्य आलोकऋषीजी म.सा., पूज्य तिर्थेशऋषीजी म.सा., महासतीजी पूज्य सत्यप्रभाजी म.सा., महासतीजी पूज्य अमितज्योतीजी म.सा., आदी साधूसाध्वीजींच्या सान्निध्यात झालेल्या या कार्यक्रमाला जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार संग्राम जगताप, मध्य प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांचे उपसचिव आय.ए.एस. सुधीरकुमार कोचर, समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी अहिल्यानगरचे सुपुत्र, मुंबईचे सुप्रसिद्ध उद्योगपती तसेच तिरुपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ बोरा, महापौर ज्योतीताई गाडे, ॲड. शिवाजीराव काकडे, हर्षदाताई काकडे, उपमहापौर धनंजय जाधव, सौ. राखी सौरभ बोरा, प्रमिलाबाई हेमराजजी बोरा, पराग बोरा व बोरा परिवार, समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी व कमिटीचे सदस्य उपस्थित होते.

पूज्य उपाध्यायश्रीजी यांच्या मार्गदर्शनात उपस्थित सर्व भाविकांनी पूर्ण समर्पणाने समग्र अर्थ समजून घेत नवकार महामंत्राचा लयबद्ध जाप केला. अनुष्ठान सांगते नंतर अभिमंत्रित झालेले पाणी उपस्थितांनी प्राशन केले.

पूज्य प्रविणऋषीजी म.सा. म्हणाले, आयुष्यात कोणत्याही कठीण प्रसंगी अथवा चांगल्या प्रसंगात श्रद्धेने केलेला नवकार महामंत्र जाप लाभदायक असतो. नवकार महामंत्र हा जैन धर्मातील सर्वात महत्त्वाचा व मूलमंत्र आहे. पंचपरमेष्ठींना नमन करणारा हा मंत्र सर्व पापांचा नाश करणारा आणि सर्व मंगलांमध्ये प्रथम मंगल आहे. नकारात्मकता दूर करणारा आहे. मंत्र सर्व पाप कर्मे नष्ट करणारा आणि आत्म्याला शुद्ध करणारा आहे. नियमित जपामुळे मन शांत होते आणि एकाग्रता वाढते.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, चातुर्मास हे त्याग व तपस्येचे पर्व आहे. याठिकाणी नवकार महामंत्राचा विक्रमी जाप नगरच्या भूमीत झाला आहे. हा मंत्र आत्मबल वाढवतो. याची अनुभूती सर्वांना आज आली. पुढच्या पिढीत हा धर्म संस्कार रूजत आहे ही आनंदाची बाब आहे. आचार्यश्रींची जन्मभूमी शिराळ चिचोंडीच्या रस्त्याचे काम तातडीने मार्गी लावले जाईल.

आमदार संग्राम जगताप म्हणाले, समर्पण चातुर्मासामुळे नगर शहर भक्तीमय बनले आहे. नवकार महामंत्राचा जाप सकारात्मकता निर्माण करणारा आहे. यातून प्रत्येकाचे उज्वल भविष्य घडेल. चातुर्मासाचे अतिशय सूक्ष्म नियोजन कमिटीने केले आहे. त्यामुळे प्रत्येकाला या धार्मिक पर्वणीचा आनंद मिळत आहे.

शिवाजीराव काकडे म्हणाले, ऐतिहासिक समर्पण चातुर्मासासाठी शिक्षण संस्थेची जागा देण्याचे भाग्य लाभले. यानिमित्त साधूसंतांचे सान्निध्य व मार्गदर्शन लाभत आहे. सामूहिक नवकार महामंत्र जाप खूप ऊर्जादायी असल्याची अनुभूती आली.

आय. ए.एस सुधीर कुमार कोचर म्हणाले, उपाध्यायश्री सान्निध्यात येणाऱ्या प्रत्येकाचे जीवन बदलून टाकतात. त्यांचे आशीर्वाद लाभणे हे आपले भाग्य आहे. आचार्यश्रींच्या भूमीतील हा समर्पण चातुर्मास अलौकिक ठरत आहे. आजच्या काळात परिवारातील लहान थोरांनी एकोप्याने राहणे आवश्यक आहे. सेवा, संस्कार, सेतू, संवाद, स्नेह अशा विविध ७ सूत्रांनी परिवार एकजूट राहण्यास मदत होते.

प्रारंभी सौरभ बोरा म्हणाले, समर्पण चातुर्मासाला अभूतपूर्व प्रतिसाद मिळत असून उपाध्यायश्रीजींचे अनमोल मार्गदर्शन प्रत्येकासाठी दिशादर्शक ठरत आहे. या मोठ्या सोहळ्याचे लाभार्थी होण्याची संधी मिळाली हे आमच्या परिवाराचे भाग्य आहे. नगरमधील हा चातुर्मास संपूर्ण भारतासाठी ऐतिहासिक ठरेल असा विश्वास आहे. अशोक (बाबूशेठ) बोरा म्हणाले, समर्पण चातुर्मासात श्री गुरू आनंद जन्मोत्सव सप्ताह साजरा होत आहे.

# आय.एम.एस.सी.डी.आर. येथे ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतातील ग्रंथालय विज्ञानाचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या १३४व्या जयंतीनिमित्त आय.एम.एस.सी.डी.आर. च्या लर्निंग रिसोर्स सेंटरतर्फे ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा करण्यात आला. आय.एम.एस.चे लर्निंग रिसोर्स सेंटर हे शिक्षणाला चालना देणे, शैक्षणिक समुदायाला आवश्यक माहिती व संसाधने उपलब्ध करून देणे आणि वाचक-केंद्रित सेवा विकसित करणे यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. माहिती व तंत्रज्ञानाच्या आधुनिक साधनांचा प्रभावी वापर करून ग्रंथालयाने आपल्या सेवांची गुणवत्ता, कार्यक्षमता आणि वाचकांचे समाधान वाढविण्यावर सातत्याने भर दिला आहे.

१२ ऑगस्ट १८९२ रोजी शियाली, मद्रास येथे जन्मलेल्या डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी भारतातील ग्रंथालय विज्ञानाच्या विकासात मोलाचे योगदान दिले. त्यांनी मांडलेले ग्रंथालय विज्ञानाचे पाच नियम आजही ग्रंथालय व्यवस्थापन, माहितीसेवा आणि वाचक-केंद्रित सेवांसाठी मार्गदर्शक ठरतात. कोलन वर्गीकरण आणि वर्गीकृत सूचीकरण संहिता यांसारख्या त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाचा प्रभाव भारतासह जगभरातील ग्रंथालय विज्ञानाच्या क्षेत्रावर पडला आहे. त्यांच्या अमूल्य योगदानाची दखल घेत भारत सरकारने त्यांना १९५७ मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले.ग्रंथपाल दिन हा केवळ एका महान ग्रंथालयशास्त्रज्ञाच्या कार्याचे स्मरण करण्याचा दिवस नसून, विद्यार्थी, प्राध्यापक आणि प्रशासकीय कर्मचारी यांच्याशी संवाद साधण्याची तसेच ग्रंथालयाच्या विविध सेवांबाबत विचारांची देवाणघेवाण करण्याची एक महत्त्वपूर्ण संधी आहे. अशा उपक्रमांमुळे अर्थपूर्ण सहकार्य, नाविन्यपूर्ण कल्पनांची देवाणघेवाण आणि ग्रंथालयाशी शैक्षणिक समुदायाचे नाते अधिक दृढ होते.

या प्रसंगी आय.एम.एस.च्या प्रभारी संचालिका डॉ. प्रणोती तेलोरे यांच्या हस्ते, विशिष्ट सल्लागार डॉ. एम. बी. मेहता आणि उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस यांच्या उपस्थितीत भारतातील ग्रंथालय विज्ञानाचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

ग्रंथालय कर्मचारी श्री. धनराज घोडके यांनी उपस्थितांचे स्वागत केले. यावेळी आपल्या भाषणातून त्यांनी डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांच्या पाच मूलभूत ग्रंथालय नियमांचे आजच्या डिजिटल युगातील महत्त्व अधोरेखित केले. ग्रंथपाल दिन हा केवळ डॉ. रंगनाथन यांच्या कार्याचे स्मरण करण्याचा दिवस नसून, त्यांनी मांडलेल्या ग्रंथालयीन तत्त्वांचे आचरण आणि त्यांची आजच्या काळातील उपयुक्तता अधोरेखित करण्याचा दिवस असल्याचे त्यांनी नमूद केले.आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातही ग्रंथालये केवळ पुस्तके उपलब्ध करून देण्यापुरती मर्यादित नसून संशोधनाला चालना देणे, माहितीचे प्रभावी व्यवस्थापन करणे, वाचनसंस्कृती वृद्धिंगत करणे आणि ज्ञानाचा प्रसार करणे यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर, वाचक-केंद्रित उपक्रम आणि भारतीय ज्ञानपरंपरेशी असलेली नाळ कायम ठेवत आय.एम.एस. ग्रंथालय डॉ. रंगनाथन यांच्या विचारांना आणि पाच नियमांना आपल्या दैनंदिन कार्यपद्धतीत प्रत्यक्ष उतरवत आहे, असे त्यांनी सांगितले.ग्रंथालयाच्या पारंपरिक कार्याच्या पलीकडे जाऊन नवीन सेवा, डिजिटल संसाधने, माहितीसेवा आणि वाचकाभिमुख उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. दैनंदिन ग्रंथालयीन कामकाज अधिक कार्यक्षम पद्धतीने व्यवस्थापित करताना वाचकांचा वेळ आणि उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर सुनिश्चित केला जात आहे. हे कार्य डॉ. रंगनाथन यांच्या ''वाचकाचा वेळ वाचवा'' या चौथ्या नियमाशी सुसंगत आहे. अशा प्रकारे, डॉ. रंगनाथन यांनी मांडलेल्या पाचही मूलभूत नियमांचे तत्त्वतः नव्हे, तर प्रत्यक्ष कार्यातून पालन करण्याचा आय.एम.एस. ग्रंथालयाचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे.

# गुरुवारपासून माथणी गावात ज्ञानेश्वरी पारायणास प्रारंभ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील माथणी गावात श्री हनुमान सेवा निमित्त गुरुवार दिनांक १३ ऑगस्ट २०२६ रोजी ज्ञानेश्वरी पारायणास प्रारंभ होत आहे. त्या निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन समस्त माथणी गावकऱ्यांनी केले आहे. यावेळी विणा पूजन व व्यासपीठ श्रीक्षेत्र बाळनाथ गडाचे हभप धर्मनाथ महाराज मालुसरे करणार आहेत.अशी माहिती महाराष्ट्र



वारकरी सांप्रदाय सेवा संघटनेचे उपाध्यक्ष हभप माऊली गायकवाड यांनी दिली.

या अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यास विधान परिषदेचे सभापती ना.राम शिंदे पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील खा.निलेश लंके, माजी खा.डॉ.सुजय विखे पाटील आ. विक्रम पाचपुते, आ.अक्षय कर्डिले, प्रा.शशिकांत गाडे तसेच मान्यवर व्यक्ती उपस्थित राहणार आहेत. या सप्ताहात पहाटे काकडा, सकाळी विष्णू सहस्त्रनाम, गाथा भजन, प्रवचन, हरिपाठ, हरिकीर्तन, हरी जागर तसेच ज्ञानेश्वरी पारायण रोज सकाळी ७ ते ९ व दुपारी २ ते ४ या वेळेत होणार आहे. या सप्ताह मध्ये रोज रात्री ७ ते ९ हरिकीर्तनाचा कार्यक्रम होणार असून कीर्तन सेवा हभप मच्छिंद्र डरंगे, लक्ष्मण महाराज नांगरे, वसंत महाराज वसंतगडकर, हभप झेंडे महाराज, ज्ञानेश्वर महाराज कराळे, नंदकिशोर महाराज देवकर,हभप विकासानंद मिसाळ हे देणार आहेत. तरी भाविकांनी ज्ञानेश्वरी पारायण व कीर्तनाच्या श्रवणाचा लाभ घ्यावा.असे आवाहन माथणी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे. या सप्ताहाची सांगता गुरुवार दिनांक २० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० ते १२ हभप मंगेश महाराज मोरे (देहू)यांचे काल्याचे किर्तन व महाप्रसादाने होईल. तरी पंचक्रोशीतील भक्तगणांनी उपस्थित रहावे.असे माऊली गायकवाड यांनी सांगितले.

**मा. खासदार विखे आमदार दातेंच्या पाठपुराव्याला यश**

# पारनेरमधील तीन महत्त्वपूर्ण पुलांसाठी ७ कोटी ६८ लाखांची मंजुरी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर तालुक्यातील दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असलेल्या गारखिंडी ते अळकुटी ते पाबळ ते निघोज मार्गावरील पुलांसह डिकसळ – जामगाव मार्गावरील पुलाच्या बांधकामाला प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत तब्बल ७ कोटी ६८ लाख ३३ हजार रुपयांची मंजुरी मिळाली आहे. माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या कार्यकाळापासून प्रलंबित असलेल्या या कामांसाठी पारनेरनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी पदभार स्वीकारल्यानंतर सातत्याने पाठपुरावा केल्याने या कामांना अखेर मंजुरी मिळाली आहे.

या संदर्भात माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार काशिनाथ दाते सर यांनी मंत्रालय, मुंबई येथे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेऊन संबंधित कामांच्या मंजुरीसाठी पाठपुरावा केला. त्यानंतर प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या दि. १३ जुलै २०२६ रोजीच्या मंजुरी पत्रानुसार पारनेर तालुक्यातील या तीन पुलांच्या कामांना प्रशासकीय मंजुरी मिळाल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.

मंजूर कामांमध्ये डिकसळ ते जामगाव रस्त्यावरील चेनज ४+२५० येथे पुलाच्या बांधकामासाठी २ कोटी ६६ लाख ४२ हजार रुपये, गारखिंडी ते अळकुटी ते पाबळ ते निघोज रस्त्यावरील चेनज ०+७०० येथे पुलासाठी २ कोटी ८४ लाख ७५ हजार रुपये, तर याच मार्गावरील चेनज १+२००



**''मा. खा. डॉ. सुजय विखे पाटील यांच्या कार्यकाळात प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतून मंजूर झालेले दोन्ही रस्ते पूर्ण झाले; मात्र त्यावरील आवश्यक पुलांची कामे प्रलंबित राहिली होती. या पुलांची गरज लक्षात घेऊन सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर अखेर या कामांना मंजुरी मिळाली आहे. केंद्र सरकारचा ६० टक्के व राज्य सरकारचा ४० टक्के निधी मिळून ही कामे पूर्ण होणार असून, यामुळे परिसरातील नागरिकांचे दळणवळण अधिक सुरक्षित व सुरळीत होईल.''**

**– आमदार काशिनाथ दाते सर**
**(विधानसभा सदस्य)**

येथे पुलाच्या बांधकामासाठी २ कोटी १७ लाख १६ हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत. या तिन्ही कामांची एकूण मंजूर किंमत ७ कोटी ६८ लाख ३३ हजार रुपये इतकी आहे.

माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी या पुलांची गरज लक्षात घेऊन प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतून कामे मंजूर होण्यासाठी केलेल्या प्रारंभिक पाठपुराव्याला आमदार काशिनाथ दाते सरांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची जोड मिळाली. आमदार दाते यांनी विधानसभेचे सदस्य म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर संबंधित कामांचा सातत्याने पाठपुरावा करत ही कामे मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या या कामांना आता प्रत्यक्ष मंजुरी मिळाली आहे.

या मंजुरीबद्दल आमदार काशिनाथ दाते सर यांनी मतदारसंघातील जनतेच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे तसेच जलसंपदा मंत्री व अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह केंद्र व राज्य शासनाचे विशेष आभार मानले आहेत.

''पारनेरच्या ग्रामीण भागातील दळणवळण अधिक सक्षम करणे आणि वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले प्रश्न मार्गी लावणे ही आपली प्राथमिकता आहे. या तीन पुलांच्या मंजुरीमुळे संबंधित परिसरातील नागरिकांची मोठी गैरसोय दूर होणार असून, पुढील काळातही मतदारसंघातील आवश्यक विकासकामांसाठी सातत्याने पाठपुरावा सुरूच राहील,'' असा विश्वास आमदार काशिनाथ दाते सर यांनी व्यक्त केला.

# काहींच्या गुन्ह्याची शिक्षा संपूर्ण मुकुंदनगरला नको!

**नागरी सुविधा बंद करणे म्हणजे सामूहिक दंड; सेवाबहिष्कार आणि परिसर वगळण्याच्या मागणीची स्वतंत्र चौकशी करा – शाकीर शेख**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मुकुंदनगरमधील पथदिवा दुरुस्ती कर्मचाऱ्याच्या मृत्यूला जबाबदार असलेल्या आरोपींना कठोर शिक्षा झालीच पाहिजे; मात्र काही व्यक्तींच्या कथित गुन्ह्याची शिक्षा मुकुंदनगर, फकीरवाडा व दर्गादायरा परिसरातील हजारो निरपराध नागरिकांना देणे योग्य नाही. या परिसरातील पाणीपुरवठा, कचरा संकलन, स्वच्छता, पथदिवे व अन्य नागरी सेवा बंद ठेवणे म्हणजे बेकायदेशीर सामूहिक दंड असल्याचे सांगत सामाजिक कार्यकर्ते शाकीर शेख यांनी या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी केली आहे.



याबाबत शेख यांनी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग आणि राज्याच्या नगरविकास विभागाला सविस्तर निवेदन दिले आहे. निवेदनाच्या प्रती नाशिक विभागीय आयुक्त, अहिल्यानगर जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक तसेच संबंधित अभिलेख व इलेक्ट्रॉनिक पुरावे जतन करण्यासाठी अहिल्यानगर महानगरपालिका आयुक्तांना पाठविण्यात आल्या आहेत. अहिल्यानगर महानगरपालिकेच्या एलईडी पथदिव्यांच्या देखभाल-दुरुस्तीचे काम करणाऱ्या खासगी कंपनीकडे कार्यरत धीरज परदेशी हे सहकाऱ्यांसह मुकुंदनगरमध्ये गेले असताना त्यांच्यावर जीवघेणा हल्ला झाला. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. ही घटना अत्यंत गंभीर, अमानुष आणि निषेधार्ह असून हल्ल्यात सहभागी प्रत्येक आरोपीचा निष्पक्ष तपास करून कठोर कारवाई करावी, अशी स्पष्ट भूमिका शेख यांनी मांडली आहे.

दिवंगत धीरज परदेशी यांच्या कुटुंबाला संबंधित कंत्राटदार कंपनीने कर्मचारी भरपाई, विम्याची रक्कम आणि लागू कामगार कायद्यांनुसार सर्व आर्थिक व कायदेशीर लाभ तातडीने द्यावेत. महानगरपालिकेने नुकसानभरपाई प्रत्यक्ष मिळेपर्यंत संबंधित कंत्राटदार कंपनीकडे पाठपुरावा करावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. कामगार युनियनच्या भूमिकेवर आक्षेप घटनेनंतर महानगरपालिका कामगार युनियनने कामबंद आंदोलन केल्यामुळे शहरातील कचरा संकलन, घंटागाड्या आणि अन्य नागरी सेवांवर परिणाम झाला. विशेषतः मुकुंदनगर, फकीरवाडा व दर्गादायरा परिसरात अधिकारी आणि कर्मचारी काम करणार नाहीत, अशी भूमिका घेऊन तेथील नागरिकांवर नागरी सेवाबहिष्कार घालण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. युनियनने महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा बोलावून हे तीनही परिसर महानगरपालिका हद्दीतून कायमस्वरूपी वगळण्याचा ठराव मंजूर करण्याची मागणी केल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. एखाद्या गुन्ह्यातील आरोपींवर कायदेशीर कारवाईची मागणी करण्याऐवजी संपूर्ण अल्पसंख्याकबहुल परिसर महानगरपालिका हद्दीतून वगळण्याची भूमिका भेदभावपूर्ण, अधिकारबाह्य आणि असंवैधानिक असल्याचे शेख यांनी म्हटले आहे.

महानगरपालिका कामगार युनियन ही शहराची हद्द निश्चित करणारी वैधानिक संस्था नाही. त्यामुळे संबंधित परिसर वगळण्याची मागणी तत्काळ फेटाळण्यात यावी. महानगरपालिकेने असा कोणताही ठराव मंजूर केला असल्यास त्याची अंमलबजावणी स्थगित करून तो रद्द करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. आयुक्तांच्या भूमिकेची स्वतंत्र चौकशी करा कामगारांच्या सुरक्षेची जबाबदारी महानगरपालिका आणि पोलिस प्रशासनाची आहे. संबंधित कर्मचाऱ्यांना पोलिस संरक्षण, सुरक्षा साधने आणि प्रशासकीय मदत देणे आवश्यक होते. मात्र सुरक्षेच्या नावाखाली नागरिकांचे पाणी, स्वच्छता, आरोग्य, कचरा संकलन व प्रकाशासारख्या अत्यावश्यक सुविधांवरील अधिकार हिरावून घेता येत नाहीत, असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. कामबंद आंदोलनाच्या काळात पर्यायी कर्मचारी किंवा यंत्रणा उपलब्ध करण्यात आली का, नागरी सेवा सुरळीत ठेवण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आणि युनियनची सेवाबहिष्काराची भूमिका आयुक्तांनी तत्काळ का फेटाळली नाही, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

महानगरपालिका आयुक्तांच्या भूमिकेवरच गंभीर आक्षेप असल्यामुळे त्यांच्या अधीनस्थ अधिकाऱ्यांकडून चौकशी न करता विभागीय आयुक्त किंवा स्वतंत्र वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत कालबद्ध चौकशी करावी. कर्तव्यपालनात कसूर आढळल्यास आयुक्तांसह संबंधित अधिकारी, कर्मचारी व युनियन पदाधिकाऱ्यांविरुद्ध शिस्तभंग आणि कायदेशीर कारवाई करावी, असे शेख यांनी म्हटले आहे.

मुकुंदनगरची बदनामी दूर करण्याची मागणी काही आरोपींच्या कथित कृत्याशी संपूर्ण परिसराचा संबंध जोडल्यामुळे मुकुंदनगरमधील निरपराध नागरिकांना हिंसक, गुन्हेगारी किंवा महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे शत्रू म्हणून चित्रित करण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थी, महिला, तरुण, व्यापारी, नोकरी करणारे नागरिक, मालमत्ताधारक व भाडेकरू यांच्या प्रतिष्ठेवर, रोजगारावर, व्यवसायावर आणि सामाजिक संबंधांवर विपरीत परिणाम झाल्याचे शेख यांनी म्हटले आहे. मुकुंदनगरची झालेली बदनामी दूर करण्यासाठी शासन आणि महानगरपालिकेने अधिकृत स्पष्टीकरण जारी करावे. काही व्यक्तींच्या कथित गुन्ह्यासाठी संपूर्ण परिसर किंवा समाजाला जबाबदार धरता येणार नाही, हे स्पष्ट करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. सीसीटीव्हीसह सर्व पुरावे जतन करा महानगरपालिका कार्यालय आणि आंदोलनस्थळावरील सीसीटीव्ही चित्रीकरण, पाणीपुरवठ्याच्या नोंदी, घंटागाड्यांचे जीपीएस अभिलेख, कर्मचारी हजेरी, बैठकीचे इतिवृत्त, युनियनची मागणीपत्रे, पोलिस पत्रव्यवहार तसेच अन्य इलेक्ट्रॉनिक पुरावे तातडीने जतन करण्याची मागणी शेख यांनी केली आहे. कामबंद आंदोलनासाठी सक्षम परवानगी घेण्यात आली होती का, अत्यावश्यक सेवा जाणीवपूर्वक बंद करण्यात आल्या का आणि कर्मचाऱ्यांवर आंदोलनात सहभागी होण्याची सक्ती करण्यात आली का, याची निष्पक्ष चौकशी करावी.

# दुकानाच्या उद्घाटनावरून वाद; लोखंडी रॉडने मारहाण केल्याचा आरोप

**पैठणमध्ये दोघांविरुद्ध अ‍ॅट्रॉसिटीसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–**दुकानाच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमासाठी घेतलेल्या जागेवरून वाद निर्माण झाल्यानंतर दोघांनी जातीवाचक शिवीगाळ करून लोखंडी रॉडने मारहाण केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी पैठण पोलिस ठाण्यात दोघांविरुद्ध अ‍ॅट्रॉसिटी अ‍ॅक्टसह भारतीय न्याय संहितेतील विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी मनीष भिकाजी आठवले (वय ३२, व्यवसाय, रा. साळेवाडी, पैठण) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ९ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास गट क्रमांक १८२/१, पैठण येथे दुकानाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम सुरू होता. कार्यक्रमासाठी फिर्यादीने जागा कराराने घेतल्याचे तक्रारीत नमूद आहे.

यावेळी परिक्षित सतीश पुंड व सचिन उर्फ बाबासाहेब तुपे (दोघे रा. पैठण) हे तेथे आले. सदर जागा आमच्या मालकीची असल्याचे सांगत त्यांनी वाद घातला. त्यानंतर शिवीगाळ करून जातीवाचक अपशब्द वापरल्याचा तसेच लोखंडी रॉडने खांद्यावर व पोटात मारहाण केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. तसेच जिवे मारण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणी पैठण पोलिस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. ३०८/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(१), ११५, ३५१(३), ३५२, ३(५) तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियमातील ३(१)(), ३(१)(), ३(२)() अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील पाटील करीत आहेत. घटनेमुळे परिसरात चर्चेला उधाण आले असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# संभाजीनगर विमानतळाला इमिग्रेशन चेकपोस्ट मंजूर करा

**खासदार संदिपान भूमरेंची अमित शाहांकडे मागणी; डॉ. श्रीकांत शिंदेंचे समर्थन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** छत्रपती संभाजीनगर विमानतळावर तातडीने इमिग्रेशन चेकपोस्ट () मंजूर करून आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू करण्याचा मार्ग मोकळा करावा, अशी मागणी खासदार संदिपान भूमरे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे केली. शिवसेनेचे लोकसभा गटनेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनीही या मागणीला समर्थन दिले.
अजंठा-वेरूळ, देवगिरी किल्ला यांसह महत्त्वाची पर्यटनस्थळे आणि वाढता औद्योगिक विस्तार पाहता संभाजीनगरला थेट आंतरराष्ट्रीय हवाई कनेक्टिव्हिटीची गरज असल्याचे भूमरे यांनी पत्रात नमूद केले. विमानतळाची ब्युरो ऑफ इमिग्रेशनकडून पाहणी पूर्ण झाली असून, केवळ मंजुरीचा टप्पा प्रलंबित असल्याचे त्यांनी सांगितले.
इमिग्रेशन चेकपोस्टला मंजुरी मिळाल्यास पर्यटन, उद्योग, व्यापार आणि विदेशी गुंतवणुकीला मोठी चालना मिळून मराठवाड्याच्या आर्थिक विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास भूमरे यांनी व्यक्त केला.



(पान १ वरून)

## राहात्यात एलसीबीची वाळू तस्करांवर कारवाई

सापळा रचून संशयित दोन पिवळ्या रंगाचे डंपर थांबवण्यात आले. वाहनांची तपासणी केली असता, त्यात अवैध वाळू आढळून आली. वाळू वाहतुकीचा कोणताही परवाना नसल्याने डंपर चालक विशाल नितीन कोल्हे (वय २१, रा. गणेशवाडी, शिर्डी) आणि दौलत एकनाथ सोनवणे (वय ४०, रा. केलवड, ता. राहाता) यांना ताब्यात घेण्यात आले. या कारवाईत १५ लाख रुपयांचा टाटा कंपनीचा डंपर (-१७--७७१६), १५ लाख रुपयांचा एक विना क्रमांकाचा टाटा डंपर आणि प्रत्येकी २० हजार रुपयांची वाळू, असा ३० लाख ४० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वाहन मालक कोते (रा. शिर्डी) आणि चौधरी (रा. नांदुर्खी) यांच्या सांगण्यावरून ही वाळू वाहतूक करत असल्याची माहिती वाहनचालकांनी दिली.
या प्रकरणी राहाता पोलीस ठाण्यात चौघांवर भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास राहाता पोलीस करत आहेत.
कारवाईत यांचा सहभाग
ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे तसेच पथकातील पोलीस अंमलदार अतुल लोटके, निळकंठ कारखेले, रणजीत जाधव, योगेश कर्डीले आणि दीपक जाधव यांनी केली.

## चार पुलांसाठी १२ कोटी ३४ लाखांचा निधी मंजूर

प्रत्यक्ष कामांना लवकर सुरुवात करावी. पुलांची कामे निर्धारित कालावधीत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करून नागरिकांना त्याचा लाभ मिळवून द्यावा, अशी अपेक्षा संबंधित गावांतील नागरिकांकडून व्यक्त होत आहे. या चार पुलांच्या मंजुरीमुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील ग्रामीण दळणवळण अधिक सक्षम होऊन विकासकामांना गती मिळणार असल्याचे खासदार निलेश लंके यांच्या वतीने सांगण्यात आले.

## मनपा कर्मचारी धीरज परदेशी खून प्रकरणाचा तपास तातडीने मार्गी लावून गुन्हेगारांना कडक शासन करा

अबाधित राहण्यासाठी गुन्हेगारी प्रवृत्तींवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. काम करणाऱ्या शासकीय व महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्नही गंभीर झाला आहे. कर्तव्य बजावत असताना कर्मचाऱ्यांवर हल्ले होणार असतील तर नागरिकांना नागरी सुविधा देताना कर्मचाऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होऊ शकते. त्यामुळे या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करून कायद्याचा धाक निर्माण करावा, अशी मागणी राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या वतीने करण्यात आली.

यावेळी नगरसेवक सुरेश बनसोडे, वैभव ढाकणे, अंजली आव्हाड, सारिका खताडे, शारदा जगदाळे, सुरेखा कडूस, शितल गाडे, लता गायकवाड, ललिता पवार, लतिका पवार, निर्मला जाधव, अलिशा गर्जे, युवराज शिंदे, अक्षय भिंगारदिवे आदी उपस्थित होते.